REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# श्रीकांत देशमुख यांच्या कवितेतील मिथके आणि आदिबंध

डॉ. कविता मुरुमकर

**प्रस्तावना :**

आदिम व प्रगत या दोन्ही मानव समाजात मिथके आढळतात. मिथकांची निर्मिती मानवी संस्कृतीच्या विकासाच्या दुसऱ्या टप्प्यावर झाली. मानवाने भाषेचा शोध लावला. भाषेच्या साहयाने तो निसर्गाची गूढे उकलू लागला व त्याचा अन्वयार्थ लावू लागला. निसर्गातील विविध घटितांचा अन्वयार्थ लावताना मिथकाची निर्मिती झाली. मानवी जिज्ञासा ज्ञान, कुतुहल आणि बाहयसृष्टी या विषयीचे आकलन जाणून घेताना सृष्टीची उत्पत्ती, जन्म – मृत्यू – पुनर्जन्म, ईश्वराची निर्मिती इत्यादि नैसर्गिक व सृष्टीरुपातील घटना – घडामोडींचा अन्वयार्थ लावताना मिथकाची निर्मिती झाली. डलजी या इंग्रजी संज्ञेला मराठीत मिथक असे म्हणतात. मिथक म्हणजे दंतकथा. मानवी मनात असलेल्या अदिम संस्काराची बीजे मिथकात आढळून येतात. मिथक ही सांस्कृतिक मूल्याचे वहन करण्याचे कार्य करतात. त्यामुळे मिथक हे मानवी जीवनाचे, साहित्य–संस्कृतीचे अपरिहार्य अंग ठरले.

मराठी कवितेत अनेक कवी – कवयित्रीनी आपल्या अभिव्यक्तीसाठी मिथकांचा वापर केला आहे. कधी प्रतिकात्मक कथन काव्यासाठी तर कधी ऐतिहासिक घटिताचे कथन करण्यासाठी तर कधी समकालीन जाणिवेचे आकलन करताना यातील कालातीतता व्यक्त करण्यासाठी मिथकांचा वापर झालेला दिसून येतो. मिथके कवीच्या संवेदनशीलतेला दृष्टीकोनाला आणि जीवनजाणिवांना प्रकट करतात. कवीच्या भावविश्वात व काव्यविश्वात ही मिथके अधिकच अर्थपूर्ण असतात. कालानुसार व परिस्थितीनुसार मिथके नवनवीन अर्थ धारण करीत असल्याचे दिसून येते. प्रस्तुत लेखात श्रीकांत देशमुख यांच्या 1. बळीवंत 2. आषढमाती 3. बोलावे ते आम्ही या काव्यसंग्रहातील कवितेतील मिथकाचा विचार करत आहे. श्रीकांत देशमुख यांच्या कवितेतील काही महत्वपूर्ण मिथके पुढीलप्रमाणे –

**बोलावे ते आम्ही –**

तुकारामासकट त्यांच्या अभंगओळींना मिथक आहे. गाथा इंद्रायणीत बुडवल्यांचे मिथक. तुकोबासारख्या कुणब्याने हाती लेखणी घेवून बंडखोरी केल्याचे मिथक परंपरेने, संस्कृतीने, प्रस्थापितांनी ज्याचे बोलणे नाकारलं होते. किंबहुना ज्याचे बोलणं गृहीतच धरले नव्हते अशा मूकसमाजाचा नायक तुकोबा. कुणब्यांचा प्रतिनिधी तुकोबा. 'बोलावे ते आम्ही' या हक्काने स्वतःला आणि समस्त कुणबी समाजाला अभिव्यक्त होवून न्याय देतो आहे. जोपर्यंत आम्ही (कुणबी) बोलणार नाही तोपर्यंत कुणब्यांची दुःखे, त्यांचे प्रश्न, त्यांच्या व्यथा, जगण्यातले त्याचे संघर्ष, अडचणी कुणालाच कळणार नाहीत. त्याच्या परीघाबाहेरच कुणीतरी त्याच्यावर लिहावं हे तसं न्याय देणारं मुळीच असणार नाही. कारण कुंणब्याच दुःख परकायाप्रवेश करुन अधिक नेमकेपणांन कुणालाच मांडता येणार नाही. कुणब्याचं दुःख मांडायला तुकोबाचाच वारसदार हवा. याच वारसाहक्काने मराठी कवितेत श्रीकांत देशमुख यांना 'बळीवंत' 'आषाढमाती', 'बोलावे ते आम्ही' या तीन काव्यसंग्रहातील कवितेतून कुणब्याच्या दुःखाची गाथा लिहली आहे.

**भूमी :–**

श्रीकांत देशमुख यांच्या कवितेत भूमी या मिथकाचा वापर अनेकदा केलेला दिसून येतो. भूमी आणि स्त्री एकात्म मिथक आहे. सर्जन आणि समृध्दीचं अदितत्व भूमीतून साकार होते. भूमी हे सर्जक सामर्थ्याचे आदिबंधात्मक मिथक आहे. पावसात न्हावून निघालेली भूमी वृक्ष, पशुपक्षी, धनधान्याने सुफल होत असे. त्यामुळे प्राचीनकाळी भूमी हे सर्जनासोबत समृध्दीचे प्रतीक मानले गेले. वायुपुराणात भूमीची महती गाताना म्हटले आहे :

सैषा धात्री विधात्री च धारणी च वसुन्धरा ।
चराचरास्य लोकस्य प्रतिष्ठा योनिरेव च ।।
(वायुपुराण 62.197)

सर्वांना निर्माण करणारी, सर्वांची धारणा करणारी चराचराची आधार, प्रतिष्ठा आणि उत्पत्तिस्थान असलेली भूमी पृथूने लोकहितासाठी दोहिली आहे. यावरुन भूमीचे सर्जनसामर्थ्य प्रतित होते.

श्रीकांत देशमुख यांच्या कवितेतील भूमीचा उल्लेख अनेकदा येतो. त्यांच्या कवितेतील भूमी हे मिथक आदिम स्त्री, आदिमाता, सीता, स्त्रियांशी जोडले गेल्याचे दिसून येते.

'भुईची निरी आलटून पालटून उकलत
गर्भणीला द्यावा अलगद अंकुटण्याचा होकार
अगणित बाया मातीसोबत माती होताहेत'

भूमी आणि स्त्री हे येथे एकात्म मिथक आहे. कारण सर्जनाचे सामर्थ असलेल्या त्या समस्त मानवजातीला समृध्द करतात. भूमी जशी महामाता बनून समस्त सृष्टीवर गर्भ उदरी जोपासतो तशी स्त्रीही माता बनून आपल्या उदरी मानववंशाची बीजे रुजवून त्याचे प्रजनन, संरक्षण, संगोपन करते. 'अगणित बाया मातीसोबत माती होताहेत किंवा भूमी उसवून भूमिगत होताना एक बाई मी पाहिली आहे' असं जेव्हा कवी म्हणतो तेव्हा कवीच्या आदिम नेणिवंत जनन, मरण आणि पुनर्जनन हे जीवनचक्र असते. मातीसोबत माती होण म्हणजे सर्जन करता करता लयास जाणे किंवा भूमी उसवून (जन्म) भूमिगत होणे (मृत्यू)हे केवळ स्त्रीचेच जीवनचक्र नाही तर भूमीचे जीवनचक्रही ऋतुचक्राकार फिरत असते. ग्रीष्मात करपलेली भूमी (लय) वर्षाऋतूत सुफलसुफळ (निर्मिती) करते. या भूमिकेतून भूमी आणि स्त्री या अव्देती अन्वयार्थाचे आकलन होते. समग्र सृष्टीची महामाता भूमी आहे तर मानवाची माता स्त्री आहे. भूमी आणि स्त्रीच्या अव्दैताचा अन्वयार्थ लक्षात घेवून मनूने म्हटले आहे की,

" क्षेत्रभूता स्मृता नाटी, बीजभूतः स्मृतः पुमान् ।
क्षेत्र बजिसमायोगात संभवः संभवः सर्वदेहिनाम् ।। "
(मनु. 9.33)

स्त्री ही भूमीरुप (क्षेत्ररुप) आहे. तर पुरुष हा बीजरुप आहे. भूमी आणि बीज यांच्या समायोगातून सर्व प्राणिमात्रांचा जन्म होतो. बीज उदारी रुजवणाऱ्या आणि निर्मितीचे आदिकारण असलेल्या भूमी या मिथकाचा वापर कवीने अनेक कवितातून केल्याचे दिसून येते.

### सीता :–

'बोलावे ते आम्ही' या काव्यसंग्रहातील 'भूमी' (पृष्ठ 25) या कवितेत कवीने सीतेचे मिथक वापरले आहे. रामायण या आर्षमहाकाव्यातील सीतेचे मिथक वापरुन कवीने समस्त स्त्रियांच्या वेदना सर्जकतेने या मिथकीयरुपातून व्यक्त केल्या आहेत. सीता ही रामायण या महाकाव्याची महानायिका भूमिकन्या, जनकपुत्री. सीतेच्या जन्माचे, तिचे भूमिकन्या असण्याचे आणि त्याचबरोबर तिचे भूमिगत होण्याचे मिथक कवीने कलात्मकतेने वापरले आहे. सीता →भूमी →स्त्री→आदिमस्त्री या चौफेर अन्वयार्थातून ही कविता साकार होते. सीतचे मिथक असे आहे की सीता ही भूमिकन्या. राजा जनकाला भूमी नांगरताना मातीत एक पेटी सापडली, त्यात एक स्त्रीजातीचे अर्भक होते. जनकाने त्या बाळाचा पिता म्हणून स्वीकार केला आणि ती मुलगी जनकपुत्री जनकी झाली. हीच जानकी आयोध्येचा राजा दशरथाची स्नुषा. रामाची अर्धांगीने आणि लवकुश या भावंडाची माता झाली. राजस्नुषा असूनही सीतेच्या नशिबी वनवास आला. चौदा वर्षे ती वनवासात रामाची सावली बनून राहिली. वनवास समाप्तीनंतर ती आयोध्येला आली. तेव्हा पुन्हा रामाने तिला 'रावणाने पळविलेली सीता पवित्र असेल का?' या पारध्याच्या संशयामुळे सोडून दिले. लव आणि कुश या रामाच्या मुलांना तिने जंगलातील आश्रमात जन्म दिला. पुढे सीतेला स्वतःचे पावित्र्य सिध्द करण्यासाठी अग्निपरीक्षा द्यावी लागली. श्रीकांत देशमुख यांनी सीतेच्या

मिथकाचा वापर सर्जकतेने केला आहे. या मिथकीय वापरातून सीता →भूमी → स्त्री हा एकात्मभाव ते सूचित करतात. तसेच या मिथकातून स्त्रियांच्या वेदना, अवहेलनां सर्जकतेने व्यक्त होते. या मिथक वापरामागे आदिमस्त्रीच्या आदिबंधात्मक मिथकरुपाचा अन्वयार्थ कवी जोडतो. –

नांगराच्या फाळातून जन्माला येऊन
नांगर तासात अदृश्य एक बाई
फिरतेय युगांयुगापासून

'युगांयुगे' या शब्दांतून कालातीतता व्यक्त होते. पुढे कवी सीतेच्या मिथकाला, समग्र स्त्रीजातीच्या दुःखाशी व अवहेलनेशी जोडतो.

"ती तांबडी, काळी पांढरी, पिवळी
रुपेरी अठरापगड रंगाची भूमी
भूमिगत होताना मी पाहिली आहे"
(भूमी 25 –बोलावे ते आम्ही)

"सीताफळ बागेची गोष्ट" या लोककथेचा, लोकगीताचा बाज असलेल्या कवितेत कवीने सीतेच्या 'मिथकाचा सर्जकतेने वापर केला आहे. या कवितेत चारित्र्याचा संशय घेतलेली सीता बनवासाला जात आहे.' संशयाचा झाकोळ असलेलं राजवाडयांचचं सुख तिला नको आहे. ही सीता आत्मनिर्भर आहे. रामाकडून तिला कोणत्याही भौतिक सोईसुविधा नको आहेत. वनात वनाराणी ही ती निरामय नितळ पारदर्शी जीवन जगणार आहे. भूमीला जशी सर्जनाची आस असते. निर्मितीचा सोस असतो तशी सीता ही रामाकडून झालेली गर्भधारणा सोबत होवून गर्भाचे संगोपन करणार आहे. सीतेच्या मिथकाचा अन्वय भूमीच्या आदिबंधात्मक मिथकांशी एकत्वरुप झाला आहे.

## आदिपूरुष –

आदिपूरुष ही आदिबंधात्मक मिथकीय प्रतिमा. नेणिवेतील पितृविषयक घटकांना आदिमपुरुषाच्या प्रतिमेत संघटीत केले जाते. युंगने सामूहिक नेणिवेचा विचार मांडला. जाणीव व्यक्तीगत नेणिव आणि सामूहिक नेणिव असे तीन मनाचे स्तर युंगने सांगितले. व्यक्तिने स्वतः घेतलेल्या अनुभवांचा साठा वैयक्तीक नेणिवेत असतो. आखिल मानवी समाजाच्या आदिम अनुभवांपासून सामुहिक नेणिव संचित होते. मेंदूच्या अनुवंशिक संरचनेशी ती संलग्न असते. सामूहिक नेणिवेतले अनुभव मानवाच्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात. सामूहिक नेणिवेतील काही अनुभव सतत पुनरावृत्त होतात. कारण ते अमीट असतात. या आदिम पुनरावृत्त होणाऱ्या घटनांना, प्रतिमांना आदिबंध म्हणतात. प्राक्कथा म्हणजे मिथक. मिथक म्हणजेच आदिबंध 'दि आर्किराइप्स ऑफ लिटरेचर' या निबंधात मांडला आहे. मिथकांचा आणि आदिबंधांचा अन्वयार्थ लावताना मानवी जीवनातील विविध अवस्था ऋतू आणि साहित्यप्रकार यांच्यातील परस्परसंबंध शोधल्यानंतर नायकाच्या शोधयात्रेच्या कथांमध्ये अर्थातच क्वेस्ट मिथ मध्ये याचे मूळ शोधता येते असे फ्राय यांना वाटते. कविता आणि आदिबंधानात्मक मितकाचा अन्वय डॉ.मॉड बॉडकिन यांनी आपल्या 'आर्किटायपल पॅटर्नस इन पोएट्री' या ग्रंथात मांडलेला दिसून येतो. यावरुन दिसून येते की, प्राचीन आणि अर्वाचीन कवितेत आढळणाऱ्या आदिम प्रतिमा म्हणजे आदिबंधात्मक आकृतीबंध होय.

श्रीकांत देशमुख यांच्या कवितेत आदिम पुरुषाचे मिथक पित्याच्या आदिबंधातून साकार होते. तर आदिमस्त्रीचे मिथक भूमी आणि महामातेच्या आदिबंधातून साकार होते. तसेच त्याच्या काही कवितेत संज्ञेचा आदिबंधही दिसून येतो. 'भूमी सावरण्याची गोष्टी' (बोलावे ते आम्ही। पृ 3, 4 तसेच 'आदिपुरुष') (बोलावे ते आम्ही। पृ.7.) या कवितेत आदिमपुरुषाचे मिथक पित्याच्या आदिबंधातून साकार होते. आदिबंधातील हा पिता कर्तृववान असतो.

ते

बोलत नाही युगांतराबद्दल
सांगतो
फक्त नांगराच्या फाळाची गोष्ट

श्रीकांत देशमुख यांच्या कवितेतील पित्याच्या आदिबंधातला हा आदिम पुरुष कालातील आहे.त्याला युगांतराबद्दल बोलणं तितके महत्वाचे वाटत नाही. कारण त्यांच आदिम असणं तो जाणतो. त्याला बोलावे वाटते ते त्याच्या सर्जनसामर्थ्याबद्दल. नांगराचा फाळ हे सर्जनसहाय्यभूत असणारे प्रतिक आहे. स्त्रीही भूमी असेल तर पुरुष हा बीजरुप आहे. भूमीच्या उदरी बीज रुजवण्यासाठी नांगराचा फाळ सर्जनसहाय्यभूत जो पुरुषलिंग अवयवाच्या प्रतिमेला ध्वनित करतो. अर्थातच भूमी सावरण्याची गोष्ट म्हणजे भूमीच्या सुफलीकरणाची गोष्ट असते. पुरुषाच्या सर्जनसामर्थ्याची धमक असते ! हा आदिमपुरुष किंवा आदिबंधात्मक पिता स्वतःच्या सर्जनसामर्थ्याबद्दल स्वतःला कर्तृत्ववान समजतो. तो या भूमीला सुफलीकरण करण्यासाठी त्याला सहाय्य करण्याच्या अनेक घटकांच्या ऋणाईत आहे. पाऊस पडेपर्यंत, भूमीला ओलेती करेपर्यंत दुष्काळ सोसणाऱ्या व ऋतूंना सावरणाऱ्या झाडांचा आभारी आहे. नांगर तयार करणाऱ्या लाकूडतोडया विषयी त्याला आस्था आहे. हा आदिपुरुष श्रध्देय आहे म्हणून अपरंपार आभाळाखाली माथा टेकतोय. तो संवेदनशील आहे. तो चांदण्याच्या स्पर्शाने शहारतो. इतिहासाविषयी तो जाणिवपूर्वक अज्ञात आहे तर अश्मयुगीन आदिम लौकिक पारलौकिक देवधर्माच्या शोधाच्या गोष्टीत त्याला रस नाही. त्याला रस आहे तो फक्त त्याच्या सर्जनाच्या कर्तृत्ववान भूमी सावरण्याच्या (सुफलीकरणाच्या) गोष्टीत. बैलाच्या आभाळभिडया सामर्थशाली खांद्यात ! येथे बैल हे पौरुषाचे प्रतीक आहे. आदिबंधातील पिता हा कर्तृत्ववान असतो याची तंतोतंत प्रचिती श्रीकांत देशमुखांच्या आदिपुरुषाच्या आदिबंधात्मक मिथकीय वापरातून दिसून येते.

'आदिपुरुष' (बोलावे ते आम्ही।पृ 7 ) या कवितेतही आदिपुरुषाचे मिथक आहे जे पित्याच्या आदिबंधातून व्यक्त होते.

'सगळया शक्यता संपवून
मृत्यूनंतरही जग उभारणारा
तू आहेस आदिपुरुष'

आदिपुरुष हो मृत्यूनंतरही जग उभारतो. हा आदिपुरुष सृष्टी सातत्यासाठी विनाशातून नवनिर्माण करतो. 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' या संकेतातून सृष्टीसातत्याचं चक्र तो विलय आणि निर्माणाशी जोडून ठेवतो. म्हणून श्रीकांत दुशमुखांच्या कवितेतील हा आदिपुरुष सगळया शक्यता संपून गेल्यावर मृत्यूनंतरही जग उभारणारा आदिपुरुष आहे. मातीला अहेवपण देणारा पिता (बोलावे ते आम्ही ।पृ 93) भूमीचे सुफलीकरण करणारा आदिपुरुष असतो. नेणतं झाड या कवितेतील कवीच्या जाणिवेतील पित्याच्या प्रतिमा आदिपुरुषाच्या नेणिवेतल्या प्रतिमेशी एकरुप होते. वादळ वाऱ्यांचे कपडे ल्यालेला, आस्मानी सुलतानी संकटे झेलत माळरानावर खुरटयां बाभळीसारखा उभा असलेला पिता निष्पर्ण कोरडा करडकाळा आहे. तरीही त्याच्या मनगटात मातीला अहेवपण देण्याचे, तिला धनधान्याने सुफल करण्याची धमक आहे. आदिबंधातला पिता हो नेहमीच कर्तृत्ववान असतो. कवीचा पिता या पित्याच्या भूमिकेत आहेच परंतु समस्त कष्टकरी कुणब्याचं प्रतिनिधित्व तो करत आहे.

## स्वात्मरुपाचा आदिबंध –

माणसाच्या व्यक्तिमत्वात जे बहुविध आणि परस्परात गुंतलेले घटक असतात त्यात एकात्मता घडवून आणण्याची क्षमता स्वात्मरुपाच्या आदिबंधात असते. ते चेतना आणि अचेतना जाणीव आणि नेणिवेशी संबंधित असतात. 'बोलावे ते आम्ही' या काव्यसंग्रहातील काही कवितात स्वात्मरुपाच्या आदिबंधाची प्रचिती येते. उदा. 'घागरआभाळ' ही कविता. या कवितेत आदिपुरुषाच्या प्रतिमेशी नेणिवेत कवी इतका एकरुप झाला आहे की, तो आदिमपुरुष म्हणजे कवी स्वतःच आहे. याची जाणिव या कवितेतून होत राहते.

कवीच्या (आदिपुरुषाच्या) अंगाखांद्यावर पाखरांची गर्दी आहे. जणु ती त्याच्या देहावर रुजली आहेत. सुगरण कवीच्या पापणीवर खोपा बांधणार आहे तर चिमणी चारापाणी म्हणून कवीच्या पापणीआडचा आसवांचा थेंब पिल्लांना पाजणार आहे. ही देहावर रुजलेली पाखरं कवीच्या देहाचं गाणं गात आभाळात झेपावणार आहेत आणि आभाळभर फिरणार आहेत. कवीच्या अर्थातच आदिपुरुषाच्या तळहातात चिमण्यांच घरअंगण असणार आहे.

कवीच्या बोटांना राघू लगडले आहेत. पाखरांना आपल्या अंगाखांद्यावर सहारा निवारा देता यावा म्हणून कवीने काळया कसदार भूमीत पायाची मूळ खोल खोल रुजवली आहेत आणि यातूनच कवी उर्जा मिळवत आहेत. कवी जुनाट अरण्यासारख्या दाही दिशांना वाढत आहे. पाखरांना वंशावळ आणि संसार कवी प्राणपणाने सांभाळत आहे. कवीच्या मनात जाणिवेनेणिवेतला आदिपुरुष कवीला कवीसारखाच वाटता वाटता आपण स्वतःच तो आहोत असे वाटते. विश्वरुप मीच आहे. या उन्नत, महन्मंगल जाणिवेने कवी त्याच्या व्यक्तिमत्वात दडलेल्या आदिपुरुषाच्या जाणिवेशी, संकल्पनेशी इतका एकरुप, एकात्म झाला आहे. झाला आहे की तो आदिपुरुषास स्वात्मरुपात अनुभवतोय !

'बोलावे ते आम्ही' काव्यसंग्रहातील 'भूमी सावरण्याची गोष्ट' (पृष्ठ 3) आणि 'आदिपुरुष' (पृष्ठ 7) या कवितेतून जाणवते की कवीच्या जाणिवेतला नेणिवेतला आदिपुरुष हा सृष्टीच्या निर्माणाला महत्व देणारा आहे. तो मानवी आणि मानवेत्तर जीवसृष्टच्या निर्माण आणि संरक्षणांसाठी स्वतःला सहाय्यभूत घटक समजतो. कवी आदिपुरुषाच्या भूमिकेशी तादात्म्य पावला आहे. आदिपुरुषाशी स्वात्मरुप झाला आहे. म्हणूनच तो पाखरांचे संसार आणि वंशावळ सांभाळण्यासाठी जुनाट अरण्य होवून दाहीदिशांना वाढतोय. मानवेत्तर जीवसृष्टीच्या निर्माण आणि संरक्षणासाठी तो सज्ज आहे. (उदा. 'घागर आभाळ' पृष्ठ 97) या कवितेत जाणवते की कवी दुहेरी पातळीवर सर्जक आहे. तो कविता करतो. तो झाडे लावतो. तो सृजनशील आदिपुरुषाचे स्वात्मरुप अनुभवतो त्याच्यासाठी 'कवितेच होते झाड आणि झाडाची होते कविता.' वाढत्या वयाच्या जीवनजाणिवेबरोबर कवीचं झाडावरचं प्रेम वाढलं नाही तर ते तो आईच्या गर्भात असताना, आई पाखरांना जीव लावताना कवीसोबत दीर्घायुषी झाडाचं मूळ वाढलं आहे.

"आईच्या गर्भातील वास्तव्यात
ती शेतात राबताना
पाखरांना जीव लावताना
माझ्यासोबत वाढलं असांव
एखाद्या दीर्घायुषी झाडाचं मूळ"

इथे 'दीर्घायुषी झाडाचं मुळ' या प्रतिमेत आदिमत्व आहे. मातेच्या गर्भातला जीव अचेतन अवस्थेत असूनही आदिमत्वाच्या चेतनेशी तादात्म्य आहे. कारण कवी याच कवितेत म्हणतो की एका पिढीतून दुसऱ्या पिढीत अलगद सरकरणारी झाडं कवीच्या पेशीपेशींवर दाटीवाटीनं वाढलेली आहेत. झाडाच्या प्रतिकात्मकतेतून कवीचं आदिपुरुषाशी एकरुप होणं आणि आदिपुरुषाच्या रुपानं स्वात्मरुप अनुभवणं याची प्रचिती अनेक कवितांतून येते.

कवीची निर्माण आणि संरक्षकाची भूमिकाही अनेकदा जाणवते.

"या झाडाजवळ कुठल्याही मानवसदृश्य प्राण्याला
मी आतापर्यंत जाऊ दिलं नाही
वाढल्या झाडाच्या कोवळा शेंडा खुडणारी
हिस्त्रं बोटं मी अनेकदा पाहिली आहेत"
(झाडाची गोष्ट पृ. 97 बोलावेने आम्ही)
कवी भूमीच्या सर्जनतत्वाला स्वात्मरुपात अनुभवतो
"नव्या कोंभाच्या आशेनं
होती मी गाळ मातीला बिलगून"

माझ्या देहावर करावी सात्विक बियाची पेरणी
कायम पाऊसपाणी पाखरांची गाणी
लवलवणारा हिरवा तजेलदार कोंभ
तसा उगवावा माझ्रा देह

माझ्या देहाची होवो हिरवीगार माती ”
(समाधी पृ. 105 बोलावेने आम्ही)

**आदिमाता :–**

आदिमाता ही आदिबंधात्मक मिथकीय प्रतिमा श्रीकांत देशमुख यांच्या अनेक कवितांतून दिसून येते. कवीच्या नेणीवेतला आदिमातेचा अनुबंध कवीची जैविक आई, भूमाता (भूमी), सीता निंदणाऱ्या स्त्रियां, समस्त स्त्रीजात (आदिमायेच्या रुपात) या भूमिकेतून अविष्कृत होतात. थोडक्यात, भूमी, आई, सीता, कष्टकरी स्त्रियां या कवितेच्या नायिका आहेत. या नायिकांतून सूक्ष्मअतिसूक्ष्मपणे आदिमस्त्रीच्या – महामातेच्या अनुबंधाचा अविष्कार होतो.

“वर्षानुवर्षापासून साठलेल्या पूर्वजांच्या उत्कट बीजातून
जन्माला आलेली आदिमाय”
(आदिमाये पृ.131 बोलावे ते आम्ही)
आदिमाया ही आदिमस्त्री आहे हे सूचित होते.
कवी पुढे म्हणतो–
“आदिमानवानं पेरला असेल दाणा
भुई उकरुन श्वापदासारख्या कणखर हातांनी”

आदिमाया ही भूमी आहे हे सूचित होते.

कवीच्या सर्जनबीजातून पुन्हा आदिमायेच्या रुपाला (कन्येला) जन्म देणारी कवीची पत्नी ही आदिमायाच आहे. कवी म्हणतो –

“तुझ्या देहावर आरस्पानी
आहे एक लवलवता अंकुर
नव्या जीवाला पुन्हा जन्म देणारा
सृजनाचं देखणेपण उमललं माझ्यातून”

कवी नुकतीच जन्माला आलेली मुलगी आदिमायेच्याच रुपात अनुभवतोय –

“माझ्या कोवळया आदिमाये
तुझ्या पायाचे नितळकोरे तळवे
भूमीचा स्पर्श होण्याआधी
मी फिरवतोय जगरहाटी पाहिलेल्या
माझ्या व्यवहारी हिंसक गालावरुन ”

असामान्य कर्तृत्व असणाऱ्या स्त्रियांपासून ते सर्वसामान्य कष्टकरी स्त्रियांत कवी आदिमायेला पाहतोय. अर्थातच समस्त स्त्रीजीवात कवीला आदिमायाच दिसतेय.

“तू नांदावीस शेती मातीत
उजळावंस वातीत
नाचावं मातीत
वाऱ्यावर उडतील, भुरभुरतील तुझी जावळं
आदिमाये कायम माझ्या आसपास”

समस्त स्त्रीजीवासाठी कवी शुभचिंतन करतो. बाईचं सुफलीकरण व्हावं (तू नांदावीस शेतीभातीत), तिच्या कर्तृत्ववाने ती दैदिप्तमान व्हावी (उजळावीस वातीत) तिच्या मुक्त वाढीला मुक्त स्वातंत्र्य असावं (वाऱ्यांवर उडतील, भुरभुरीत तुझी जावळं), तिच्या अस्तित्वाची उब अनेक नात्याच्या भूमिकेतून कवीला लाभावी (आदिमाये कायम माझ्या आसपास) हीच कवीची मनोकामना आहे.

## पुनर्सजन :–

"एकेक अवयव क्रमाक्रमानं जाईल गळून काय उरेल मग"
(समाधी पृ. 104 बोलावे ते आम्ही)

मणक्याच्या वेदनेचं काळ अस्वल कवीवर चालून येतंय. कवीचा देह आता वेदनेची दुधडी भरुन वाहणारी जिवंत समाधी झालाय. या मरणप्राय वेदनेतून कवीला सुटका करुन घ्यायची आहे. मुक्त व्हायचंय. पण या मुक्तीतून त्याला नवसर्जनाच रुप व्हायचं आहे. 'मी नसेन तेव्हा मी भूमीची हिरवीगार माती असेन' या न्यायाने कवीला मरणप्राय वेदनेतून मुक्त होवून

"नव्या कोंभाच्या आशेनं
होतो मी गाळ मातीला बिलगून
माझ्या देहावर करावी सात्विक बियाची पेरणी
कायम पाऊसपाणी, पाखराची गाणी
लवलवणारा हिरवा तजेलदार कोंभ
तसा उगवावा माझा देह
माझ्या देहाची होवो हिरवीगार माती"
(समाधी पृ. 105 बोलावे ते आम्ही)

ही कविता Muths, Dreams and Mystries या ग्रंथातील आहे डॉ. एलियाद यांच्या चिंतनाची आठवण करुन देते. ^ The life concentrated in one person overflows that person and manifests itself on the cosmic or collective scale. A single being transforms itself into a cosmos or take multiple rebirth in a whole vegetable species or race of mankind. A living whole bursts into fragments and disperses itself in myriads of animated forms. In other terms, here again we find the well–known cosmogonic pattern of the perimordial 'wholeness' broken into fragments by the act of creation".

एका व्यक्तीत केंद्रीत झालेले जीवन हे त्या व्यक्तित्वातून ओसंडते अणि स्वत:ला वैश्विक अथवा सामूहिक प्रमाणात प्रकट करते. एक व्यष्टिरुप जीवन समग्र समष्टीचे रुप धारण करते. किंवा साऱ्या वनस्पतीजातीच्या अथवा मानववंशाच्या रुपाने पुनर्जन्म घेते. एक चैतन्यमयी समग्रता अनेक अंशांत परिस्फुटीत होते आणि असंख्य सचेतन रुपांत विखुरते. असे म्हणता येईल की, विश्वनिर्मितीच्या संदर्भात अनेक अंशरुपात परिस्फुटित झालेली आदिम समग्रता सर्जनक्रियेमुळेच व्यष्टिरुपातून समष्टीरुपाच्या धारणेत पुन्हा एकदा आढळते याचा प्रत्यय श्रीकांत देशमुख यांच्या कवितेत अनेकवेळा येतो.

"मी मातीआड झाल्यानंतर
सळसळावं माझ्यावर
एखादं दीर्घायुषी झाड"
(मातीआड झाल्यानंतर पृ.93)

या ओळीतून कवीची दैहिक मुक्तीतून नवसर्जनाची आस प्रतित होते. जैविक आईच्या गर्भातून केलेला प्रवास भूमातेच्या उदारपर्यंत करुन Back to Mothers Womb पुनरपि जननीजठरे शयनम्। भूमातेच्या गर्भात नव्याने अंकुरण्यासाठी रुजणे ही कवीच्या सामुहीक नेणिवेतील धारणा येथे लक्षात येते.

फ्राईडने व्यक्तिगत अचेतनाची मांडणी केली. सी.जी.युंगने सामूहिक अचेतनाची मांडणी केली. या दोन्ही अचेतनांमधून साहित्याची निर्मिती होत असते. याच न्यायाने कवी स्वतः व्यक्तिगत . आदिमपुरुष सामुहिक, कवीचा जैविक पिता व्यक्तिगत . आदिपिता, आदिपुरुष सामुहिक, कवीची जैविक आई व्यक्तिगत . भूमी, आदिमाता, आदिस्त्री सामूहिक अशा प्रकारच्या व्यक्तिगत चेतन . अचेतनाच्या तसेच सामुहिक चेतन–अचेतनाच्या संयोगातून कवीने काव्यनिर्मिती केली आहे. श्रीकांत देशमुख यांच्या मनाच्या चेतन, अर्धचेतन आणि अचेतन या पातळयांच्या नाजूक गुंतागुंतीतून त्यांची कविता जन्माला येते. त्यामुळे या कवितेला मानसशास्त्रीय, आदिबंधात्मक, मिथकीय पोत आहे.

## मोर :–

मोर ही मिथकीय प्रतिमा आहे. मोर आणि भूमी यांचा एकत्वाचा संबंध आहे. दक्षिण–द्राविडी संस्कृतीत शक्ती ही मोररुपात आहे ही धारणा आहे. मोर आणि भूमी यांच्या एकत्वाचा अन्वयार्थ उलगडून दाखवताना पी. थंकप्पन नायर **'Folklore'** या मासिकातील (1973) **'The Peacock'** या नावाने लिहिलेल्या संशोधनात म्हणतात, "द्राविडांच्या दृष्टीने मयूर हो भूदेवीचा प्रतिनिधी आहे आणि हा मयूरपूजेचा संप्रदाय दक्षिण भारतातूनच सर्व जगभर पसरला. भारतातील आदिम जातीत मयूर हा नेहमीच भूमातेशी निगडीत मानला जातो." श्रीकांत देशमुख यांच्या कवितेत मोराचा उल्लेख दोन कवितांमध्ये येतो. ष्मोरश (बोलावे ते आम्ही पृ.71) आणि ष्उजेडाचे मोरश (बोलावे ते आम्ही पृ.91)

'मोर' (बोलावे ते आम्ही पृ.71) ही वास्तववादी कविता आहे. भारताच्या राजधानीतले हे मोर जागतिकीकरणाचे सूचन करतात. राजधानीत नाचणारे हे मोर लोकवस्तीला घाबरणारे नाहीत. ते भिडस्त आहेत. सायरनच्या आवाजाने ते घाबरत नाहीत. सरार्ट धावणाऱ्या गाडयांना ते घाबरत नाहीत. इंडिया गेटजवळ असणाऱ्या माणसांच्या गर्दीलाही त घाबरत नाहीत.

"मोगल गार्डनातही मोर आहेत
राष्ट्रपतीशी बोलताहेत
देशातल्या बदलत्या ऋतूमानाच्या गोष्टी
अणुस्फोटामुळं पोखरण परिसरातील
मोराची जमात संपल्याच्या गोष्टी
अणू रुजला
मोर पांगले"
'मोर' (बोलावे ते आम्ही पृ.71)

अणुस्फोटामुळे पोखरण परिसरातील मोरांच्या जमाती संपल्याची गोष्ट ते राष्ट्रपतीला सांगत आहेत. अणु रुजला, मोर पांगले, मानवाने स्वतःच्या सुरक्षिततेसाठी, भौतिक प्रगतीसाठी अणुचाचणी केली. पोखरणची अणुचाचणी यशस्वी झाली पण ज्या भूमीवर ज्यांचा हक्क होता ते मोर तिथून निघून नाहीसे झाले. मानव भूमी, वने यावर कब्जा करुन पशुपक्षांचा आधिवास नष्ट करत आहे. मानवी अभिलाषा, अहंकार, लालसेतून भूमीवर भीषण संहार होत आहे. हा मोर राष्ट्रपतीना पर्यावरणीय संवेदनशीलतेचे भान देत आहे. तसेच भूमीच्या निसत्वाची गोष्ट सांगत आहे. अणुचाचणीला वापरलेली भूमी गर्भ काढलेल्या स्त्रीसारखी असते. निसत्व. असुफला, भूमीच्या विध्वसांचं सूचन हा मोर करीत आहे.

"वटवाघळांच्या सावलीत
नजूक पावलं टाकीत मोर नाचताहेत"
'मोर' (बोलावे ते आम्ही पृ.72)

अमानवीकरणाच्या दहशतीत मोर जगत आहेत. भूमीच्या विध्वसंतेचं भय त्यांना आहे. राजधानीच्या भूमीची निराकार माती तर राष्ट्रपित्याच्या रक्तानं माखलेली आहे. जागतिकीकरण अमानवीकरणातल्या भूमीचं दुःख मोर या कवितेतून सूचित करत आहे.

उजेडाचे मोर या कवितेत आईच्या स्मरणाची वेदना आहे. टाळू भरणारी आई, तिचे मायाळू आषाढडोळे कवीच्या वेदनेवर फुंकर घालतात. डोंगराआडून येणाऱ्या उजेडाच्या मोराची वाट कवी पाहून आहे. मोर नाचत येतील त्यावेळी कवी सर्वांगावर मातीचा थर कवटाळून बसलेला असेल. आदिस्त्री, भूमी, आई, मोर. कवीचं मातीला (भूमीला) कवटाळताना मोराचं नाचत येणं या सर्व कवीच्या अबोध नाणिवेतील प्रतिमा भूमी + मोर + आई या एकत्वाचा निर्देश करतात.

## बळी :—

श्रीकांत देशमुख यांच्या काव्यसंग्रहाचे नाव ष्बळीवंतश आहे. यातील कविता कृषिसंस्कृतीचा व्यापक पट मांडतात. कुणब्याचं भावविश्व या कवितेतून साकार झाले आहे. कुणबी हा बळीचा वारसदार आहे. बळी या मिथकाच्या अन्वयार्थ कुणब्याच्या शोषणाशी जोडून त्याला समकालाशी जोडले आहे. कुणबी हो व्यवस्थेचा बळी आहे. हे अनेक कवितातून सूचित होते. प्रल्हादाचा नातू असलेला बळी हा पहिला शेतकरी राजा होता. पहिला भूमीपुत्र राजा. उच्चवर्णीय निम्मवर्णीयांच्या संघर्षलढयात बळीराजा परंपरागत धारणांना महत्व देतो. तो बटूच्या 'तीन पावलांपुरती जमीन' या डावपेचाचा बळी ठरतो. बटू हा व्यवस्थेचे प्रतिक आहे. बळी हा व्यवस्थेचा बळी आहे. बळीचा वारसाहक्क असलेले सारे कुणबी बळीवंत आहेत. बळी या मिथकाला समकालाशी जोडले तर भांडवलशाही, आणीबाणीनंतर झालेला कृषीसंस्कृतीचा ऱ्हास, खेडयाचे यांत्रिकीकरण, जागतिकीरणाचा होणारा परिणाम या व्यवस्थेतील कुणब्यावर होतो. यातून शोषणाचे एक व्यापकरुप प्रकट होते. पुराणकालात असो वा समकालात  कुणबी हा व्यवस्थेचा बळी असतो. हे या मिथकीय प्रतिमेतून सूचित होते. कृषीसंस्कृतीतील कुणब्याची वेदना ही बळीराजापासूनच्या परंपरागत शोषिततेचे प्रतीक आहे. बळी हा जसा व्यवस्थेचा बळी ठरला तसा कुणबी राबता राबता शेतात मातीमोल होत आहे.

## निष्कर्ष :—

1. बळी, विठ्ठल, सीता, आदिमाय, आदिपुरुष या मिथकांचा वापर करुन श्रीकांत देशमुख पुराणकाळातील मिथकांचे विरुपण करुन त्यातून वर्तमानकालीन आशय व्यक्त करतात.
2. रामायण हा आर्ष महाकाव्यातील सीतेचे मिथक वापरुन कवीने समस्त स्त्रियांच्या वेदना सर्जकतेने व्यक्त केल्या आहेत.
3. आदिमाता ही मिथकीय प्रतिमा श्रीकांत देशमुख यांच्या अनेक कवितेतून दिसून येते. कवीच्या नेणीवेतल्या आदिमातेचा अनुबंध कवीची जैविक आई, भूमाता (भूमी), सीता, निंदणाऱ्या स्त्रिया, समस्त स्त्रीजात (आदिमायेच्या रुपात) या भूमिकेतून आविष्कृत झाल्याचे दिसून येते.
4. श्रीकांत देशमुख कवितेत मिथकाचा वापर करुन पारंपारिक व पौराणिक आशयाला समकालीन जीवनाचा संदर्भ जोडतात.
5. श्रीकांत देशमुख यांनी आपल्या कवितेत मिथकीय आकृतीबंध वापरुन कृषिसंवेदनेचे आशयसूत्र मांडत असलल्याचे दिसून येते.
6. वाङमयीन संहितेतील व्यक्तिनिष्ठ अनुभव आणि संस्कृतिसंचितातील कल्पनाबंध यांची कलात्मक गुंफण करीत श्रीकांत देशमुख आपल्या कवितेतून आदिबंधाचा व मिथकाचा आविष्कार करतात. मराठी कवितेतील मिथकसृष्टीला समृध्द व संपन्न बनवण्यात त्यांचे उल्लेखनिय योगदान आहे.

## संदर्भ :—

1. मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 2000, खंड —9
2. डॉ. रसाळ सुधीर : कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशनगृह, मुंबई, 1982
3. संज्ञासंकल्पना कोश, (संपा. सदानंद भटकळ, वसंत आबाजी डहाके, प्रभा गणोरकर व इतर) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1999,

4- I.A.Richards : Principals of Literary Criticism
5- Rene Wellek : Concept of Criticism